# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक ०८/०६/२०२३ (गुरूवार)

---

## अवैधरित्या दारूची वाहतुक करणा—या आरोपीस अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दिनांक ०८.०६.२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रात्रगस्त पेट्रोलिंग दरम्यान पोलीस स्टेशन पारशिवनी हद्दीत फिरत असता गोपनिय मुखबीरद्वारे मिळालेल्या माहीतीवरून नाकाबंदी केली असता, एक संशईत मारूती ८०० क्र एम एच ३१ एएच ०८४३ क्रमांकाची कार चेक केली असता, सदर कार मध्ये मोहाफुल गावठी दारूची वाहतुक करतांना मिळुन आली.

**जप्त मुद्देमाल** १) तीन रबरी टयुबमध्ये १५० लिटर मोहाफुल दारू कि १५०००/— २) एक मारूती ८०० क्रमांक एम एच ३१ ए एच ०८४३ ची कि १,००,०००/—असा एकुण १,१५,०००/—रू चा माल जप्त केला.

**आरोपी नाव** :— हरीचंद्र फगलाल मरकाम वय २२ वर्ष रा शिलादेवी तह पारशिवनी याचेविरूध्द कलम ६५ (अ)(ई) महाराष्ट्र दारूबंदी कायद्याखाली गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री माहुरकर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि श्री राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, रोशन काळे, पोलीस नाईक विपीन गायधने यांचे पथकाने केली आहे.

(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.)

## लोंखंडी अँगल चोरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— अंतर्गत कलकुहि कचारी सांवगा १० कि मि उत्तर,येथील फिर्यादिचे शेतामध्ये वाल कंपाउन्ड करीता शेतामधील जमिणीमध्ये लावलेले लोंखंडी अँगल एकुन १२७ नग प्रत्येकी नग ४००/— रू प्रमाणे एकुन किंमत ५०,८००/— रू चा माल कोणीतरी अज्ञात आरोपीने जमिनीमधुन उखडुन कापुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— माणिक दादारावजी पाटील वय ६२ वर्ष रा. कचेरी सावंगा मो क्र ९५१७७०९८९६ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास — सफौ/बंसोड पोस्टे कोंढाळी मो.नं. ९७६४०९०२०८ हे करीत आहे.